■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 77 ■ शनिवार दि. 26 एप्रिल 2025 ■ RNI NO.- 2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू. 5

दैनिक आरंभ मराठी

arambhmarathi535@gmail.com

# पाण्यासाठी जिल्ह्यात होरपळ; ५७ प्रकल्प कोरडे पडण्याच्या मार्गावर

## उपयुक्त पाणीसाठा २३ टक्क्यांवर,महिन्यात पाणीसाठा ११ टक्क्यांनी कमी

### भूम तालुक्यातील परवरूड आणि आंबी येथे टँकर सुरू

आरंभ मराठी | धाराशिव

**वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संकट गडद होत असून, प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. सध्या जिल्ह्यातील २२६ छोट्या मोठ्या प्रकल्पापैकी ५७ प्रकल्पानी तळ गाठला आहे. भूम तालुक्यातील दोन गावात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात असून, चार तालुक्यातील नऊ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. वाढत्या तापमानामुळे एक महिन्यात सर्व प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठ्यातील ११ टक्के पाणी कमी झाले आहे. सध्या फक्त दोन गावात टँकर सुरू असले तरी मे महिन्यात टँकरची संख्या वाढण्याची शक्यता आहे.**

पाटबंधारे विभागाच्या २६ मार्चच्या अहवालानुसार जिल्ह्यातील २२६ प्रकल्पात ३४ टक्के उपयुक्त पाणीसाठा होता. तर २३ एप्रिल रोजीच्या अहवालानुसार सध्या फक्त २३ टक्केच उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. एक महिन्यात तब्बल ११ टक्के पाणी कमी झाले असून, उन्हाळा जसजसा तीव्र होतोय त्याप्रमाणे पाणीटंचाईचे संकट आणखी गडद होताना दिसत आहे. जिल्ह्यातील २२६ प्रकल्पापैकी ५७ प्रकल्प कोरडे पडले असून, १६ प्रकल्पांचा उपयुक्त पाणीसाठा दहा टक्क्यांपेक्षा खाली आलेला आहे. त्यामुळे पुढच्या पंधरा दिवसात ७५ पेक्षा अधिक प्रकल्प कोरडे पडण्याची शक्यता आहे. ऊसाच्या शेतीमुळे वाढलेला बेसुमार उपसा आणि वाढत्या उष्णतेमुळे होत असलेले बाष्पीभवन यामुळे उपयुक्त पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठ्या असलेल्या सीना कोळेगाव प्रकल्पात देखील केवळ १७ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. सीना कोळेगाव प्रकल्पातील पाणी दररोज अर्ध्या टक्क्यांनी कमी होत असून, हाच वेग कायम राहिल्यास ३१ मे पर्यंत सीना कोळेगाव धरण देखील तळ गाठण्याची शक्यता आहे. पावसाळा सुरू होण्यास आणखी दोन महिन्यांचा कालावधी असून सध्या उपलब्ध असलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर केला तरच पाणीटंचाईच्या झळा जाणवणार नाहीत.



#### मागील वर्षीपेक्षा सध्याची परिस्थिती चांगली

मागील वर्षी २५ एप्रिल रोजी जिल्ह्यात १०२ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. सध्या फक्त चार टँकर सुरू आहेत. तसेच मागील वर्षी २५ एप्रिलला २२६ प्रकल्पात फक्त ५ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता. यावर्षी २३ टक्के पाणी उपलब्ध आहे. परिस्थिती मागच्या वर्षीपेक्षा बरी असली तरी ऊस शेतीमुळे यावर्षी पाणीउपसा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच उन्हाची तीव्रता मागच्या वर्षीपेक्षा जास्त असल्यामुळे पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत आहे.

#### पाणीटंचाईचे संकट तीव्र होणार

जल्ह्यातील एकूण २२६ छोट्या मोठ्या प्रकल्पापैकी ७ प्रकल्प कोरडे पडले आहेत. उरलेल्या प्रकल्पात सध्या २३ टक्के पाणीसाठा असून वाढत्या उन्हामुळे आणि बेसुमार उपशामुळे हा पाणीसाठा देखील वेगाने कमी होत आहे. सध्या पाणीटंचाईचे संकट भीषण नसले तरी सध्याच्या उन्हाची तीव्रता पाहता पाण्याचा उपसा वाढणार आहे, तसेच बाष्पीभवनामुळे देखील पाणी वेगाने कमी होणार आहे. पावसाची जून महिन्यात वेळेवर सुरुवात झाली नाही तर मात्र पाणीटंचाईच्या संकटाला तोंड द्यावे लागणार आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेल्या पाण्याचा सुयोग्य वापर करण्याची गरज निर्माण झाली आहे.



#### तालुक्यातील दोन गावात टँकर सुरू

भूम तालुक्यातील पखरूड आणि आंबी या दोन गावात चार टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तर चार तालुक्यातील नऊ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यामध्ये वाशी तालुक्यातील ३, लोहारा ४ आणि कळंब व परंडा तालुक्यातील प्रत्येकी एक अशा नऊ विहिरींचे अधिग्रहण केले आहे. काही गावांचे टँकरसाठीचे प्रस्ताव येत असून, मे महिन्यात टँकरची संख्या वाढू शकते.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची वाढदिवसानिमित्त उमरगा-लोहारा तालुक्याला ५ एसटी भेट

आरंभ मराठी | उमरगा

राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचा शुक्रवारी (दि.२५) वाढदिवस साजरा करण्यात आला. परंतु तीन दिवसांपूर्वी जम्मू काश्मीर मधील पेहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वाढदिवस साजरा केला नाही. वाढदिवसाच्या दिवशी राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून त्यांनी उमरगा आगारासाठी नवीन ५ लाल परी बस उपलब्ध करून देऊन प्रवाश्यांच्या सोयीसाठी अनोखी भेट दिली. याबद्दल माजी आमदार तथा शिवसेना उपनेते यांनी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे त्यांची भेट घेऊन आभार मानले. उमरगा आगारातील चार्जिंग स्टेशनचे काम अंतिम टप्प्यात असुन, ते पुर्ण झाले की लागलीच आणखी २५ इलेक्ट्रिक बस उपलब्ध होतील. तसेच उमरगा व मुरुम बस स्थानकाच्या नूतनीकरणाच्या निविदा प्रक्रिया लवकरच पुर्ण होत असून तीही कामे लवकरच सुरू करण्यात येतील. अशी ग्वाही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिल्याची माहिती माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे.



## पोलीस अधीक्षक जाधव यांनी घेतला सोनारी येथील सुरक्षेचा आढावा

**धाराशिव :** जिल्ह्यातील अंबी पोलीस ठाणे अंतर्गत सोनारी येथील श्री. काळभैरव नाथ यांची यात्रा दिनांक २४ एप्रिल ते २६ एप्रिल दरम्यान होत आहे. यानिमित्त लाखो भाविक श्री. श्रेत्र सोनारी येथे दाखल झाले आहेत. भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचा अपघात होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या करीता जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी शुक्रवारी सोनारी येथे मंदीर परीसर, यात्रा परिसर, रथ मार्ग, वाहन पार्कींग व्यवस्थेची पाहणी केली. तसेच यात्रा बंदोबस्ताच्या कामासाठी आलेले पोलीस अधिकारी, पोलीस अमंलदार, होमगार्ड यांना योग्य त्या सुचना देवून त्यांनी मार्गदर्शन केले. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ, अंबी पोलीस ठाण्याचे सपोनि खरड व बंदोबस्तावरील अधिकारी अंमलदार उपस्थित होते. यात्रेनिमित्त सोनारी येथे २० पोलीस अधिकारी, ७५ पोलीस अंमलदार, २१५ होमगार्ड आरसीपी प्लाटून, बीडीडीएस पथक, महिला छेडछाड विरोधी पथक, नेमण्यात आले आहे.



## धाराशिव शहर आणि परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाच्या हलक्या सरी




आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहर आणि परिसरात शुक्रवारी (दि.२५) सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. शुक्रवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरणामुळे उष्णतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. दुपारी एक वाजता तापमान ४२ अंशाच्या पुढे होते. सायंकाळी पाच नंतर मात्र अचानक वातावरणात बदल झाला आणि वादळी वारे सुटले. वादळी वारे सुटले.सायंकाळी वाऱ्यामुळे धुळीचे लोट हवेत पसरले होते. वादळी वाऱ्यामुळे धाराशिव तालुक्यातील तीसपेक्षा अधिक गावांचा विद्युत पुरवठा तीन ते चार तासांसाठी खंडित झाला होता. पावसामुळे उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला असला तरी आंबा आणि इतर फळपिकांचे या पावसामुळे नुकसान झाले. तसेच ज्वारीची मोडणी करून ठेवलेला कडबा देखील पावसात भिजल्यामुळे हा पाऊस नुकसान करणारा ठरला. दुपारी ४२ अंश सेल्सिअस असणारे तापमान सायंकाळी सात वाजता ३३ अंशांपर्यंत खाली आले होते. पुढील चार दिवस धाराशिव जिल्ह्याला उष्णतेचा यलो अलर्ट जाहीर केला असून, याच काळात काही भागात वातावरणात अचानक बदल होऊन वादळी वाऱ्यासह हलका पाऊस पडेल असाही अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## @४२.७ तापमानाचा उच्चांक

आरंभ मराठी | धाराशिव

या उन्हाळ्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढतच असून, गुरुवारी (दि.२४) तापमानाने यावर्षीच्या तापमानाचा उच्चांक गाठला. गुरुवारी धाराशिव शहराचे तापमान तब्बल ४२.७ अंश सेल्सिअस इतके होते. मागील आठवड्यापासून तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढतच असून, नागरिकांनी उष्णतेपासून स्वतःची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मागील आठवड्यात तापमानाने ४२ अंश सेल्सिअसचा आकडा गाठल्यानंतर प्रत्येक दिवशी पारा एक अंशाने वाढत गेल्याचे आकडेवारी वरून दिसत आहे. परंतु, बुधवारी ४२.३ असणारे तापमान गुरुवारी चार अंशाने वाढून ४२.७ वर गेले. सकाळी सात वाजल्यापासूनच अंगातून घामाच्या धारा निघत असून, वाढत्या उष्णतेमुळे जनजीवनावर परिणाम झाला आहे. ग्रामीण भागात शेतीकाम करणे कठीण बनले आहे. तर शहरात दिवसभर बाजारपेठा ओस पडत असल्याचे चित्र दिसत आहे. धाराशिव जिल्ह्याला ३० एप्रिल पर्यंत उष्णतेचा 'यलो अलर्ट' जाहीर करण्यात आला आहे. यातच लग्नसराईच्या तारखा असल्यामुळे वऱ्हाडी मंडळींचे देखील हाल होत आहेत.



## पाकिस्तानी नागरिकांना परत पाठविण्याची कार्यवाही युद्धस्तरावर: मुख्यमंत्री

मुंबई – महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी प्राप्त केली असून, त्यांना परत पाठविण्याची कार्यवाही युद्धपातळीवर सुरु आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मिरातील पर्यटकांना परत महाराष्ट्रात आणण्यासाठी राज्य सरकारने केलेले तिसरे विशेष विमान २३२ प्रवाशांना घेऊन आज मुंबईत दाखल झाले. मंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते. यातील अकोला, अमरावती येथील प्रवाशांच्या पुढच्या प्रवासासाठी बसेसची व्यवस्था सुद्धा करण्यात आली. आतापर्यंत सुमारे ८०० पर्यटक महाराष्ट्रात परतले आहेत.

## सेवानिवृत्तीच्या दिवशी १०० किलोमिटर सायकलिंग, प्राध्यापकाकडून आरोग्य संदेश


### इतिहास अभ्यासक डॉ.सतीश कदम यांचा अनोखा उपक्रम

आरंभ मराठी | धाराशिव

सातत्याने सायकलिंग, रनिंग करत आरोग्याचा संदेश देत नवनवे विक्रम करणारे तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. सतीश कदम यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी शुक्रवारी (दि.२५) शंभर किलोमीटर सायकलिंग करून नियमित महाविद्यालयीन सेवेचा समारोप केला.यानिमित्ताने त्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. सतीश सुखदेव कदम हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवा निवृत्ती निमित्ताने शुक्रवारी महाविद्यालयात सेवा निवृत्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्ती म्हटल्यानंतर कर्मचारी मानसिक व शारीरिक दृष्ट्या स्वतःला कमकुवत समजायला लागतो, याला छेद देत प्रा. सतीश कदम यांनी तब्बल १०० किलोमीटर सायकलिंग करून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी एक चांगला संदेश दिला आहे. प्रा. सतीश कदम हे १९९३ पासून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून, इतिहास हा फक्त कागदावर न ठेवता स्मारके गडकोट किल्ले फिरून विद्यार्थ्यांमध्ये नव जागृती निर्माण केली. ते स्वतः दररोजच्या व्यायामांसोबत त्यांनी कळसुबाईचे शिखर, रायगड, हरिहर गड, साल्हेर, मुल्हेर यासारख्या अवघड शिखर व किल्ल्यावर चढाई केली आहे. कोरोना कालखंडामध्ये त्यांनी तब्बल ५ हजार किलोमीटर सायकलिंग केली होती. याचाच वारसा पुढे ठेवून शुक्रवारी पहाटे दोन ते सकाळी आठ या दरम्यान धाराशिव ते वाशी असा १०० किलोमीटरचा प्रवास करून आपला संकल्प पूर्ण केला. यानिमित्ताने याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सेवानिवृत्तीच्या वयातही सातत्याने आरोग्य जपणारे आणि इतरांना संदेश देणारे डॉ.कदम नव्या पिढीसाठी आदर्श आहेत.

#### इतिहासाचा सखोल अभ्यास

डॉ.सतीश कदम यांनी तुळजाभवानी माता आणि मंदिराच्या अनुषंगाने नवीन माहिती जगासमोर आणली.धाराशिव आकाशवाणी केंद्रावर देवीचे महात्म्य सांगणारी मालिका त्यांनी चालवली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आठ या आकड्यांचे महत्व सांगणारे पुस्तक त्यांनी लिहिले आहे. जिल्ह्यातील स्वातंत्रसैनिकाच्या जीवनावर आधारित असे झुंजलो आम्ही, या पुस्तकाचे लेखन त्यांनी केले असून, यामध्ये निजामाच्या विरोधात लढा देणाऱ्या स्वातंत्र्य सेनांनीच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.यासह त्यांनी अनेक विषयावर माध्यमांमध्ये सातत्याने लिखाण केले असून, पीएचडी प्राप्त केली आहे.






# एकच महाद्वार, मंगेशकर कुटुंबियांची देवीस गायन सेवा..







महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदीर प्राचीन चिंचपूर या गावात पाच मठाचे डोंगर कड्यावर वसलेले गाव अर्थातच आजचे श्री क्षेत्र तुळजापूर होय बालपण मंदिर रातच खेळणेबांगडणे असासायचे मंदिर रचना म्हटले तर एकच महाद्वार होते समोर पाटील वाडा कल्लोळ तीर्थच्या सम ोरच्या बाजूस पायऱ्यांच्या सुरुवातीस नारा दमुनी आणि डावा बाजूने काळोबा टोळाबा मंदिरास जाण्याचा रस्ता व जो सुरक्षितेच्या दृष्टीने बंद होता तो निंबाळकर दरवाजा जो कांही कलावधीने पुन्हा उघडण्यात आला आहे . बाहेरगावाहून येणारे भक्तगण मंदिरात जाण्यापुर्वी काशीहून पाणी कुंडात येते अशी अखीयाकी सांगण्यात येते की कल्लोळ व गोमुख तीर्थात स्नान किंवा हात पाय धुऊन मंदिरात प्रवेश करते समयी समोरच एवढेमोठे चिंचेचे वृक्ष होते की बालपणी लापाछपी खेळाजोगी त्यांच्या बुंधात तेवढी जागा होती.जेथे आज पोलिस चौकी आहे तसेच आराध्य बसण्यात येणाऱ्या भक्तांसाठी राहण्यासाठी ओवरी होत्या. आज रोजी तेथे देवदेवांताची मुर्ती सन१९८६ च्या मंदिर परिसर बदल या दरम्यान बसविण्यात आले ल्या आहेत.मुख्य प्रवेश द्वाराच्या डाव्याबाजूस गणेश मंदिर आहे . पूर्वी समोरच हळदीकुंकु नारळओटी फुले पुष्पहाराचे दुकान होते. प्रवेशद्वारातून उजव्या बाजुस नगारा व डाव्या बाजूस मार्कंडेय ऋषींचे मंदिर होते . पाच पायरी उतरुन समोरच होमकुंड आहे सध्यास्थित भक्तगणांना श्री देवीचा छबिना उत्सव पाहण्यासाठी बसण्यासाठी जेथे पायऱ्या केल्या असून तेथे पूर्वी श्री दत्त मंदिर होते. होमकुंडाच्या डाव्या बाजूने देविचीच्या मंदिरात जाते समयी प्रथम स्थानिक पिंपळ पाराचे दर्शन घेतात कारण प्रति वर्षी त्याच पिंपळपारावर विश्वात अशी एकमेव मुख्य मुर्ती चल असल्याने शारदीय नवरात्रौत्सवात कुंकुवाची उधळ करित १०८ वस्त्रांत देवी मुर्ती लपटलेली मुख्यमुर्ती नगरच्या मानाच्या पालखीत मंदिर प्रदर्शणा घेऊन याच पिंपळ पारावर पालखी विसवलेली जाते म्हणून या पिंपळ पाराचे प्रथम दर्शन घेतले जाते. याच पिंपळ पाराच्या डाव्या बाजूस पूर्वी दगडी ओवऱ्या होत्या त्याच ओवरी त थांबून भक्तगण नवरात्र उत्सव पाहत असे त्याचबरोबर होमकुंड व छबिना वाहन याच ओवऱ्या त गणेशत्सव साजरा त्याचबरोबर शांकभरीत दिग्गज कलाकार गायक उषा मंगेशकर,हृदयनाथ मंगेशकर यांनी आपली देवीस गायन सेवा दिलेली आम्ही आमच्या बालपणी स्वतः अनुभवली आहे. पुढे आपण हेमांडपंथी श्री देवीच्या मुख्य गाभारात दर्शनासाठी जात असताना दक्षिणेकडून उत्तरेकडे जात असताना पुन्हा पश्चिमेकडे जाऊन आपणास देवीची मुख्य मुर्तीचे दर्शन होते व पूर्वे कडे भवानी शंकराचे दर्शन होते. वास्तविक पाहता



शेषनाथ केशरबाई दगडोबा वाघ – तुळजापूर
कलाध्यापक – श्रीपतराव भोसले हायस्कूल धाराशिव संपर्क – ८८०६६६ ५२५३



मंदिराची प्रवेश रचना पूर्व पश्चिम दर्शन असते परंतू या तुळजा भवानी मंदिराची रचना हि वैशिष्ठपूर्ण आहे.

क्रमशः

# परंडा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे स्वच्छ आवास अभियान व मोफत आरोग्य शिबिर



**आरंभ मराठी | परंडा**

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी १०० दिवसाच्या कृती आराखडा तयार करण्याच्या सूचनेनुसार शुक्रवारी (दि.२५) परंडा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे स्वच्छ बाजार आवार अभियान व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा दिशा समिती सदस्य रणजीत ज्ञानेश्वर पाटील, रणजीत मोटे, बाजार समितीचे सभापती जयकुमार जैन, उपसभापती संजय पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव सचिन पाटील व सर्व संचालक मंडळ तसेच व्यापारी वर्ग उपस्थित होते. उप जिल्हा रुग्णालय् डॉ.विश्वेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अभिजित खरटमल यांच्या सोबत ईतर आरोग्य तपासणी पथक तसेच सर्व अधिकारी कर्मचारी यांची तपासणी करण्यात आली व सतीश भराटे यांनी नेत्र तपासणी केली. यावेळी इम्रान शेख यांनी संसर्गजन्य आजाराची तपासणी केली. तसेच समुपदेशक् मकरंद वांबूरकर यांनी केले. एच बी ,सी बी सी तोसिफ मुजावर यांनी केली. तसेच मिलिंद बनसोडे यांनी सहकार्य केले. मोफत आरोग्य शिबिरामध्ये हमाल, मापडी , व्यापारी, शेतकरी वर्गांनी तपासणी करण्यात आली.

# उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ



आरंभ मराठी| उमरगा

उमरगा शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील सभागृहात गुरुवारी (दि.२४) जिल्हाधिकारी धाराशिव व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जलतारा प्रकल्पाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जलतारा प्रकल्पाचे जनक प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी जलतारा प्रकल्पाचे महत्त्व विश्लेषण केले. यामध्ये खालावत चाललेली पाण्याची पातळी व बागायत क्षेत्र यामध्ये सुधारणा करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. जलतारा प्रकल्पाची साधी–सोपी, सुटसुटीत व कमी खर्चाच्या पद्धती बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. वाहून जाणारे पावसाचे पाणी अडविल्याने भूगर्भातील पाणी पातळी वाढवण्यासाठी जलतारा प्रकल्प एकरी एक केल्यास पाण्याच्या पातळीत निश्चित वाढ होते हे उदाहरणासह त्यांनी सांगितले. जलतारा प्रकल्पाचा दुसरा एक फायदा म्हणजे ज्या जमिनी चिबड झालेले आहेत अशा जमिनीमध्ये सुद्धा हा प्रकल्प राबवल्यास सदरची जमीन पाण्याचा निचरा होऊन पिकाऊ होऊ शकते असे प्रतिपादन त्यांनी केले. यानंतर एन.एस. जोशी यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी उमरगा तहसीलदार गोविंद येरमे, भारत शिक्षण संस्थचे अध्यक्ष अमोल मोरे, छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. संजय अस्वले, टाटा मोटर्स व नाम फाउंडेशन समन्वयक सचिन दुबे, भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुरेश दाजी बिराजदार यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमरगा तालुका कृषी अधिकारी डी. बी. रितापुरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुरूमचे मंडळ कृषी अधिकारी पटवारी यांनी केले. यानंतर श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या प्रांगणात जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला

# वा बिरदेव, जिंकलास तू...



'' तुम्ही गरिबीत जन्माला आला हा तुमचा दोष नाही, परंतु तुम्ही गरिबीतच मेलात तर हा तुमचा दोष ठरेल! '' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कोट उद्धृत करत आपली पहिली प्रतिक्रिया देणारा बिरुदेव सिद्धाप्पा डोणे हा साधा मेंढपाळाचा मुलगा आयपीएस अधिकारी झाला आहे. आता त्याची ' गरिबी हटली 'यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याच शब्दात सांगायचं झालं, तर आज तो 'शासनकर्ता' बनला आहे. भारतीय पोलीस सेवेमध्ये () तो प्रथम दर्जाचा अधिकारी झाला आहे. अफाट कष्ट, त्याग, समर्पण आणि चिकाटी याच्या जोरावर भारतीय प्रशासकीय सेवेचा अर्थातच 'स्टील फ्रेमचा ' तू भाग बनला आहे. नुकताच परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये यमगे ता.कागल, जि. कोल्हापूर या गावातील बिरदेव सिद्धाप्पा डोणे याने यूपीएससी मध्ये ५५१ वी रँक प्राप्त केली आहे. ज्या दिवशी चा निकाल लागला त्या दिवशी बिरदेव हा वडील आजारी असल्याने स्वतः मेंढया चारत होता.मेंढया चारत असतांना त्याला झाल्याच्या कॉल आला अन् बिरुदेवच्या डोळ्यातून आनंदाश्रूच्या धारा सुरू झाल्या.' शिक्षण हे समाज परिवर्तनाचे मुख्य साधन आहे.' हे अनेक शिक्षण तज्ञांनी सांगितलं आहे . मन,मेंदू आणि मनगट मजबूत करण्याचं काम शिक्षण करत.

**वक्त हर लम्हा**
**हमसे ये कहता हुआ गुजरा,**
**साथ चलना हैं तो चल**
**वरना मै तो गुजर जाऊंगा!**

स्वप्न पाहण्यास आणि ते सत्यात उतरवण्यास शिक्षण मदत करतं. '' विद्यार्थ्याला स्वतःची लायकी समजत असते. '' या शब्दात बिरुदेव आपली प्रतिक्रिया देतो, तेव्हा बिरदेवने स्वतः ची पात्रता फार पूर्वीच ओळखली होती. पुढे तो त्या मार्गाने चालत गेला ; आणि यशस्वी झाला. परीक्षा कालावधीमध्ये आणि परीक्षेची तयारी करत असताना आपल्या मावशीच्या आणि आजोबांच्या अंत्यसंस्काराला सुद्धा येता आलं नाही याचं दुःख बिरदेवला होतं. पण ' ' असं त्याचं यावर मत होतं. त्याला वडिलांच्या ऑपरेशन मुळ यूपीएससीची मुख्य परीक्षा पास होऊन मुलाखत देण्यास फक्त एक महिना तयारीसाठी मिळाला . यावर तो म्हणतो ,'कमी वेळेत सर्वोत्तम तयारी होत असते!' अनेक कारणं सांगून अभ्यासाची टाळाटाळ करणाऱ्या विद्यार्थ्यांना बिरूदेवचा हा सल्ला लाख मोलाचा आहे. आपण ज्या माणसातून, मातीतून आणि पशु–पक्षातून येतो त्याच्याशी आपली नाळ तुटू न देण्याचा ; आणि आपलं मूळ स्वरूप न कचरता प्रकट करण्याची वृत्तीच बिरूदेवला या परीक्षेत यशस्वी करण्यात उपयोगी पडली. इंग्रजी कच्च असतानाही भाषा ही अडचण न ठरता प्रयत्नांतून तिच्यावर प्रभुत्व मिळवून बिरदेवने यशाला गवसणी घातली आहे. बिरदेव डोणे याचं बालपण डोंगरदऱ्यांमध्ये मेंढ्या चारत, कधी उघड्यावर अभ्यास करत करत शिकण्यात गेलं. मेंढ्या पाळण्यात आणि त्यांचा सांभाळ करण्यात देखील मोठी आव्हानं आहेत आणि त्यापेक्षा मोठं काहीकरी केलं पाहिजे, यासाठी त्याने मेहनत घेतली. गावातील शाळेत प्राथमिक, माध्यमिक शिक्षण पूर्ण केलं. अभ्यास करायला जागा नसल्याने गावातील मराठी शाळेच्या व्हरांड्यात तो अभ्यास करायचा. पुढे अभियांत्रिकीची पदवी घेऊन बिरूदेवने दोन वर्षे दिल्ली मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेच्या परीक्षेचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यानंतर तो पुण्यात आला. त्याने दोन वेळा यूपीएससीची परीक्षा दिली, पण त्याला यशाने हुलकावणी दिली. जिद्दीने त्याने मागील वर्षी पुन्हा परीक्षा दिली आणि यामध्ये उज्वल यश मिळवत देशात ५५१ वी रँक मिळवला.



**किशोर जाधव, सोलापूर**
**मो. न. ९९२२८८२५४**

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्यांच्या तीन ' कॅटेगरी ' असतात.स्वयंघोषित, जनता घोषित, आणि आयोग घोषित. पहिल्या दोन कॅटेगरीतून तिसऱ्या कॅटेगरीत हजारातील एखादाच पोहोचतो. आणि ' सायेब ' होतो. बिरुदेव आज तिसऱ्या कॅटेगरीत गणला जात आहे. पण आज महाराष्ट्रात अनेक तरुण स्वयंघोषित आणि जनता घोषित या कॅटेगरीत राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. बिरदेव ने सांगितल्याप्रमाणे आपली लायकी त्यांनी लवकरच ओळखून पर्यायी मार्ग निवडणं आवश्यक आहे. आपल्या उमेदीचा काळ किती ताणून धरायचा हे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांनी ठरवले पाहिजे. प्रशासकीय अधिकारी या व्यतिरिक्त समाज जीवनात अनेक क्षेत्रे आहेत जी आपल्या व्यक्तिमत्वास न्याय देऊ शकतात तीही तरुणांनी ओळखली पाहिजेत. कायद्याचं राज्य हा समाज व्यवस्थेचा पाया आहे. या कायद्याच्या राज्याचे रक्षण करण्यासाठी समाज काही लोकांच्या हाती ताडनाची शक्ती देतो. ती व्यवस्था म्हणजे पोलीस. या व्यवस्थेच्या उच्च पदावर आज बिरदेव आपल्या अथक प्रयत्नातून पोचला आहे. सामान्य, दीनदलित, भटक्या आणि शोषित, वंचित समाज घटकाचे दुःख त्यांनी फार जवळून पाहिलं आहे. अशा घटकांना न्याय देण्याचे काम बिरुदेव आपल्या सेवाकाळात नक्कीच करेल. पोस्ट मिळाली की पदाचं तेज येतं, रुबाब वाढतो, माणूस उभा आडवा वाढतो. पण बिरूदेव सारखे सामान्य घरातून आलेले तरुण याला अपवाद ठरतात. आपली भाषा, जगण्याची पद्धती, साधा सरळ मोकळा– ढोकळा ग्रामीण बाज जपत बिरुदेव पुढील काळात सामान्यांना आपलासा वाटेल यात शंका नाही.कालचक्र कोणासाठीही थांबत नसतं. आजची वेळ, तारीख, दिवस विश्वाच्या अंतापर्यंत परत कधी येणार नसते. म्हणून ' उद्या ' जिंकण्यासाठी आज सिद्ध व्हा! हा संदेशच बिरूदेव ने आपल्या यशातून नवतरुणांना दिला आहे. बिकट परिस्थिती, प्रतिकूल व्यवस्था, साहित्यांचा अभाव याच रडगाणं गात बसणाऱ्यांनी एक वेळ बिरूदेव ला भेटून अथवा त्याची मुलाखत पाहून खडतर मार्गावरून जाण्यास सिद्ध व्हावं. शेवटी, आपल्या मनातील निर्धार हाच यशाकडे घेऊन जात असतो.

# ह.भ.प. अरुण महाराज काळे यांना राज्यस्तरीय संत चोखामेळा पुरस्कार

## १८ मे रोजी पुण्यात पुरस्काराचे वितरण

**आरंभ मराठी |भूम**

धार्मिक, अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातला प्रतिष्ठेचा समजला जाणारा संत चोखामेळा समता पुरस्कार भूम येथील आदिवासी पारधी समाजातील ह भ प अरुण काळे महाराज यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. संत चोखामेळा अध्यासन केंद्र, पुणे व वृंदावन फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा २०२५ या वर्षीचा संत चोखामेळा समता पुरस्कार ह .भ.प अरुण काळे महाराज भूम , डॉ. ओम श्रीश श्रीदत्तोपासक यांना संत सोयराबाई प्रबोधन पुरस्कार तर परिवर्तनवादी लेखिका छाया बेले यांना जाहीर करण्यात आला असल्याची माहिती संस्थापक सचिन पाटील यांनी दिली.

संत चोखामेळा समता पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वा. बाळासाहेब ठाकरे कलादालन सभागृह, पुणे येथे तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील जगप्रसिद्ध विश्वपुण्यधाम ( कैकाडी महाराज मठ) चे विद्यमान मठाधिपती गुरुवर्य हभप भारत महाराज जाधव यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत चोखामेळा दिंडी सोहळा प्रमुख ह .भ.प . बापूराव सांवंत महाराज तर संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रामदास चवरे आणि डॉ. दत्तात्रय डुंबरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. आदिवासी पारधी समाजातील धार्मिक क्षेत्रात प्रबोधन करणारे ह .भ.प अरुण काळे महाराज यांना वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित, वंचित घटकामध्ये समतावादी भक्ती चळवळीचा प्रसार करण्यासोबतच त्यांच्यात व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी मोठ्या प्रमाणात प्रबोधन कार्य केले आहे. वारकरी संतानी



सांगितलेंल्या मार्गाने डोळस भक्त घडवून त्यांनाही समाजहितैशी कार्यासाठी तयार करणे अशी एक अनोखी लोकचळवळ महाराज वारकरी संप्रदायाची पताका हाती घेउन चालवत आहेत. अरुण काळे महाराज यांनी स्वतःला धार्मिक क्षेत्रात झोकून देण्याबरोबरच आपल्या मुलाला देखील कीर्तनकार बनवले आहे. आदिवाशी पारधी पिढीमध्ये कधी नव्हे तो टाळ मृदंगाचा गजर घुमवला आहे. अशा काळे महाराजांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचे साहित्यिक अलका सपकाळ, कवीमनाचे पत्रकार शंकर खामकर, उद्योजक बाळासाहेब क्षिरसागर, संतोष सुपेकर, बाबासाहेब वीर, आबासाहेब मस्कर , प्रदीप साठे, हेमंत देशमुख, मुकुंद वाघमारे शांतीराज बोराडे , शुभम खामकर, ह भ पं. बन्सी काळे महाराज आदी सर्वपक्षीय सर्व सामाजिक, आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुक केले जात आहे.

# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त उद्या मिरवणुकीसह सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन

**आरंभ मराठी | धाराशिव**



बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या वतीने महामानव, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त उद्या रविवारी (दि. २७) धाराशिव शहरात भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि जन्मशताब्दी वर्षानिमित्त देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक धनंजय नाना शिंगाडे यांनी दिली. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मुकुंद घुले, माजी अध्यक्ष ॲड. परवेज अहमद, कोषाध्यक्ष विशाल शिंगाडे, मार्गदर्शन समिती सदस्य खलील सय्यद, ॲड. खंडेराव चौरे, राजेंद्र अत्रे, इलियास पीरजादे, प्रसेंजीत शिंगाडे, सरिपुत शिंगाडे, रवि कोरे आळणीकर, इंद्रजित देवकते यांची प्रमुख उपस्थिती होती. जयंती उत्सव समितीच्या वतीने यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ११ जणांना समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांचाही यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांना निमंत्रित करण्यात आले आहे.हळ्यास उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले आहे.

# मोहा-कुंभारवाडी रस्त्याची प्रचंड दुरवस्था

## निवडणुकीच्या तोंडावर आश्वासन देणाऱ्या राजकीय नेत्यांना रस्त्याचा विसर, ग्रामस्थांतून नाराजी

### विद्यार्थ्यांना शाळेत जाताना करावी लागते कसरत; शेतकऱ्यांचेही हाल

आरंभ मराठी | मोहा

**कळंब तालुक्यातील मोहा गावातून कुंभारवाडी दिशेने जाणारा रस्ता सध्या अत्यंत जर्जर स्थितीत आहे. हा रस्ता मोहा गावातील लक्ष्मी वस्ती, मोरे वस्ती, मुटकुळे वस्ती, माळी वस्ती यांसारख्या अनेक वस्तीशी जोडणारा एकमेव मुख्य मार्ग आहे. या भागात शेकडो कुटुंबांचे वास्तव्य असून दररोज शालेय विद्यार्थ्यांपासून ते शेतकरी, कामगार, महिला आणि वयोवृद्धांचा या रस्त्यावरून येणे-जाणे सुरू असते. मात्र, रस्त्याची झालेली दयनीय अवस्था यामुळे ग्रामस्थांचे रोजचे जीवन अक्षरशः संकटात सापडले आहे.**

सदर रस्त्याला जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत. हे खड्डे इतके खोल गेलेले आहेत की, वाहनचालकांना समतल रस्ता शोधून काढणे कठीण झाले आहे. दुचाकीस्वार, सायकलस्वार तसेच पादचारी यांच्यासाठी तर ही स्थिती अत्यंत धोकादायक बनली आहे. गेल्या काही महिन्यांत या रस्त्यावर लहान-मोठे अपघात घडल्याच्या घटना ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिल्या आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळेस किंवा पावसाळ्यात हे खड्डे पाण्याने भरले की त्यातून वाट काढणे म्हणजे एक जिकिरीचं काम ठरतं. अनेक वेळा निवडणुकीच्या तोंडावर आश्वासने दिली जातात मात्र निवडणूक संपल्यानंतर पुन्हा दुर्लक्षच होते, अशी भावना नागरिकांमध्ये आहे.






### विद्यार्थ्यांचे हाल : शाळेपर्यंत पोहोचणे झाले कठीण

या रस्त्याचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थ्यांना बसत आहे. रोज सकाळी लहान मुलांना शाळेत जाताना चिखल, खड्डे आणि धुळीच्या समस्यांचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात तर या रस्त्यावरून पायी चालणेही कठीण होऊन बसते. परिणामी अनेकदा मुलं उशिरा शाळेत पोहोचतात किंवा अपघाताच्या भीतीमुळे पालक त्यांना पाठवायलाच धजावत नाहीत. शिक्षणाच्या दृष्टीने हा एक गंभीर प्रश्न आहे.

### उसाचे क्षेत्र : वाहतूक ठप्प, शेतकऱ्यांची चिंता

या परिसरात उसाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. मोहा परिसरातील शेतकरी आपल्या ऊसाची वाहतूक करताना या रस्त्याचा वापर करतात. मात्र, खराब रस्त्यामुळे ट्रॅक्टर, ट्रक वाटचाल करणे कठीण झाले आहे. ऊस वाहतूक वेळेत न झाल्यास त्याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. यामुळे अनेक शेतकरी साखर कारखान्यांपर्यंत ऊस पोहोचवताना अडचणीत सापडले आहेत. यामुळे आर्थिक नुकसान सहन करत असतानाच त्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

## तेरणा महाविद्यालयाच्या फार्मसी विभागात अवयवदान जागृती आणि आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात

आरंभ मराठी | धाराशिव





महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवस कृती आराखडा या अभियाना अंतर्गत धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयातील फार्मसी विभाग आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने अवयवदान जागृतता शिबिर नुकतेच अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या फार्मसी विभागात घेण्यात आले. यावेळी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. वीरेश नंदीमठ , शल्यचिकित्सक डॉ. डीकले डॉ.राजशेखर मेनगुडे ,डॉ. शितल पिसाळ ,डॉ. नागेश वाघमारे ,डॉ अनुजा कंदले ,डॉ प्रज्ञावंत रणदिवे आणि डॉ. अक्षय होटकर या डॉक्टरांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदवला. यामध्ये फार्मसी विभागातील सर्व विद्यार्थ्यांची मौखिक आरोग्य तपासणी, त्याचबरोबर मिशन ओबेसिटी ,मिशन थायरॉइड स्क्रीनिंग आशा अनेक चाचण्या या विद्यार्थ्यांच्या घेण्यात आल्या. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना अवयव दानाविषयी अधिक माहिती देऊन अवयव दान करणे ही काळाची गरज असून यामध्ये विद्यार्थ्यांचाही महत्वाचा सहभाग असावा याविषयी डॉ. वीरेशनंदी पाटील यांनी माहिती दिली. यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, बी फार्मसी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. प्रीती माने , कार्यक्रम समन्वयक डॉ.आर बी नन्नवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने यांनी तेरणा महाविद्यालय सामाजिक उपक्रमाच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर असल्याचे सांगितले. यावेळी बी फार्मसी विभागाचे सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी सर्व डॉक्टर्सना सहकार्य करून आरोग्य तपासणी करून घेतली. त्यांच्या मनातील असलेल्या शंकांचेही निरसन करून घेतले. यावेळी बी फार्मसी विभागातील सर्व प्राध्यापक कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी तपासणीसाठी मदत केली.

## समतेवर आधारित नवभारताची उभारणी आवश्यक

### समीक्षक डॉ. ऋषिकेश कांबळे यांचे प्रतिपादन





आरंभ मराठी | मुरुम

डॉ. आंबेडकर यांनी सामाजिक समता, आर्थिक न्याय आणि बौद्धिक स्वातंत्र्य या तत्त्वांवर आधारलेला भारत घडविण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यांचा विश्वास होता की, प्रत्येक नागरिकाला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि आत्मसन्मान मिळालाच पाहिजे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून त्यांनी घटनेच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला समान हक्क मिळावेत, यासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी केल्या. जातीभेद, अस्पृश्यता आणि भेदभाव नष्ट व्हावा, हा त्यांचा प्रमुख हेतू होता. समतेवर आधारित नवभारताची उभारणी होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी केले.

मुरुम शहरातील भीमनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित बुधवारी (ता. २३) रोजी व्याख्यानाप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रा. किरण सगर होते. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, संभाजीनगरचे प्रा. डॉ. मिलिंद वाहुळे, प्रा. स्वाती कांबळे, पाशा कोतवाल, फिनिक्स सगर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. कांबळे म्हणाले की, शिक्षण हाच खरा मुक्तीचा मार्ग आणि समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन असून '' शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा '' हा त्यांचा मंत्र आजही लाखो तरुणांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. अजूनही सामाजिक विषमता, बेरोजगारी आणि शिक्षणातील असमानता या बाबतीत सुधारणा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार प्रा. महेश कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमाला शहर व परिसरातील आंबेडकरप्रेमी नागरिक उपस्थित होते.

## उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

आरंभ मराठी | उमरगा



उमरगा शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल तथा अमन स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ ते ११ मे २०२५ दरम्यान भव्य उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले असून, हे प्रशिक्षण शिबीर फक्त ५ ते २५ वयोगटातील मुला-मुलींसाठी आहे. प्रशिक्षणासाठी वेळ सकाळी ७ ते ९ पर्यंत राहील. या प्रशिक्षणाचा शहरातील तथा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा परिषद हायस्कूल चे मुख्याध्यापक पद्माकर मोरे ,लाठी- काठी, दांडपट्टाचे मार्गदर्शक तथा प्रशिक्षक महमदरफी शेख यांनी केले असून, सदर प्रशिक्षण हे शहरातील जिल्हा परिषद हायस्कुल येथे होणार आहे. या शिबिरात शिवकालीन युद्धकलेचे प्रशिक्षण मुला- मुलींच्या स्वसंरक्षणासाठी देण्यात येणार आहे. यामध्ये लाठी- काठी , तलवार, दांडपट्टा, भाला, कराटे, आणि बेसबॉल अशा विविध शस्त्रांच प्रशिक्षण दिले जाणार आहे. या शिबीरात सहभागी होण्याकरीता पद्माकर मोरे मुख्याध्यापक जि. प. हायस्कुल उमरगा मो. ९४२१८७१९५३, आयोजक- महमदरफी शेख मुख्य मार्गदर्शक व संयोजक मो. ८७८८८७४१४६ अदिनाथ गोरे संयोजक मो. ९६९८६०४०४० यांना संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## अक्षरगंगा परीक्षेत रेणुका व्यास गुणवत्ता यादीत

आरंभ मराठी | तेर



धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद पेठ शाळेतील विद्यार्थिनी कु रेणुका प्रविण व्यास हिने अक्षरगंगा आणि प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये यश मिळवले आहे. रेणुका ही अक्षरगंगा परीक्षेत ३०० पैकी १८२ गुण मिळवून केंद्रातून पहिली आली असून तिने गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. प्रज्ञाशोध परीक्षेत २०० पैकी १५० गुण घेऊन ती केंद्रातून दुसरी आली आहे. रेणुकाच्या यशाबद्दल सर्व स्तरातून तिचे अभिनंदन केले जात आहे.

## मुरुम येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पाककला व रांगोळी स्पर्धा

आरंभ मराठी | मुरूम





मुरुम शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली. त्यानिमित्त गुरुवारी (ता.२४) आयोजित करण्यात आलेल्या पाककला आणि रांगोळी स्पर्धेला महिलांचा व बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पाककला स्पर्धेत महिलांनी विविध पारंपरिक व नावीन्यपूर्ण पदार्थ सादर करत रसिकांचे मन जिंकले. चव, मांडणी आणि नावीन्य या निकषांवर परीक्षण झाल्यानंतर अश्विनी कांबळे यांनी पहिला क्रमांक पटकावत आपले पाककौशल्य दाखवून दिले. अनुजा कांबळे यांनी द्वितीय क्रमांक, तर मीरा सोमवंशी यांनी तृतीय क्रमांक मिळवत स्पर्धेची रंगत वाढवली. महिलांचा या स्पर्धेला लाभलेला प्रतिसाद उल्लेखनीय होता. याशिवाय रांगोळी स्पर्धा दोन गटांमध्ये विभागण्यात आली होती. मोठा गट आणि छोटा गट या स्पर्धेत स्पर्धकांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारल्या. मोठ्या गटात प्रथम क्रमांक तेजस्विनी हावळे, द्वितीय क्रमांक तृप्ती गायकवाड तर तृतीय क्रमांक सविता भालेराव यांनी पटकावला. तसेच छोट्या गटात प्रथम क्रमांक गुलजार लिमये द्वितीय क्रमांक गुंजन लिमये तृतीय क्रमांक गौतमी लिमये या तीनही बहिणींनी पटकावला. यात प्रांजली हावळे यांच्यासह अनेक स्पर्धकांनी उत्कृष्ट सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विशाल गायकवाड, समीर सोमवंशी, नैतिक गायकवाड, विवेक भालेराव, शुभम सावंत, प्रवीण सूर्यवंशी, आकाश गवई, विनायक कांबळे, प्रसाद बनसोडे, करण बनसोडे, संतोष कांबळे, सोहेल सैय्यद, अथर्व मुरूमकर आणि तन्मय भालेराव यांनी परिश्रम घेतले.

## विधी महाविद्यालयाची जिल्हा ग्राहक आयोगाला शैक्षणिक भेट

आरंभ मराठी |धाराशिव

येथील डॉक्टर बापूजी साळुंखे विधि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी येथील 'जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग' येथे शैक्षणिक भेट दिली .ही भेट विद्यार्थी शिकत असलेल्या ''ग्राहक संरक्षण कायदा'' या विषयाचे प्रात्यक्षिक अनुभव घेण्याच्या दृष्टिकोनातून आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ग्राहक आयोगामध्ये प्रत्यक्ष ''केस ''कशी चालते हे तेथे चालू असणाऱ्या प्रकरणाद्वारे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले. 'इन्शुरन्स 'सारखे क्लेम कसे करता येतात ,तसेच ग्राहक फसवणूक झाल्यास त्याचे निवारण कसे करावे याचे प्रात्यक्षिक यावेळी विद्यार्थ्यांनी बघितले .या प्रात्यक्षिकानंतर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षा मा.श्रीमती प्रज्ञा हेंद्रे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना'' ग्राहक संरक्षण कायदा'' या बद्दल विस्तृत माहिती देताना कायद्यातील बदल तसेच अनुभव सांगितले आणि प्रश्नोत्तराद्वारे विद्यार्थ्यांशी चर्चा केली .याप्रसंगी ग्राहक आयोगाच्या सदस्या मा.श्रीमती बोराडे मॅडम यांनीही सहकार्य केले .यावेळी अध्यक्ष मॅडम हेंद्रे यांनी सर्व विद्यार्थ्यांना त्यांचे बाल हक्क कायद्याबद्दल असलेले स्वलिखित पुस्तक'' विधी संघर्ष ग्रस्त बालके त्यासाठी न्याय व कायदा ''हे भेट केले. ही भेट प्रा. डॉ.पुनम दागडिया/ तापडिया यांच्या समन्वयाखाली आयोजित करण्यात आली. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कायला कृष्णमूर्ती यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी विधी महाविद्यालयाचे प्रथम तसेच तृतीय वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेसाठी सरपंच व ग्रामसेवकांनी घेतले प्रशिक्षण

## योजनेला गती मिळणार

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये ''गाळमुक्त धरण,गाळयुक्त शिवार'' आणि नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेबाबत जनजागृती व अंमलबजावणीसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जैन संघटना व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळांमध्ये संबंधित तालुक्यांतील ग्रामसेवक व सरपंच यांना योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. परंडा तहसील कार्यालय येथे झालेल्या कार्यशाळेत तहसीलदार निलेश काकडे, गटविकास अधिकारी मोहन राऊत, मृद व जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता प्रभाकर महामुनी, तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी टी.पी.हनवते, जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष जयकुमार जैन, सचिव जयघोष जैन, राज्य समन्वयक अशोक पवार व तालुका अध्यक्ष सुनीलकुमार डुंगरवाल उपस्थित होते. त्याचप्रमाणे भुम, लोहारा, उमरगा



व तुळजापूर येथेही या कार्यशाळा घेण्यात आल्या. भुम येथे तहसीलदार जयंतराव पाटील, लोहारा येथे रणजित कोळेकर, उमरगा येथे गोविंद येरमे तर तुळजापूर येथे पंचायत समिती सभागृहात ही कार्यशाळा झाली. सर्व कार्यशाळांमध्ये मृद व जलसंधारण विभागाचे अधिकारी प्रभाकर महामुनी यांनी योजनेची रूपरेषा मांडली. उपविभागीय जलसंधारण अधिकारी



आर.के.काळे, बी.एम.बसपुरे व सायली जाधव यांचेही मार्गदर्शन लाभले. जैन संघटनेचे समन्वयक अशोक पवार यांनी योजनेच्या सामाजिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. या उपक्रमाच्या माध्यमातून जलसंधारण, शिवार क्षेत्राचे पुनरुज्जीवन व शाश्वत शेतीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आह

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची फाउंडेशनला उद्योगभेट



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच हुबळी येथील नामांकित देशपांडे फौंडेशन या उद्योगसमुहाला भेट दिली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना सामाजिक नवोपक्रम, स्टार्टअप्स, तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग व उद्योजकीय वातावरण याचा अनुभव मिळाला. संगणक शास्त्राचा सामाजिक नवोपक्रमात होणारा वापर समजून घेणे. टेक्नॉलॉजी बिझनेस इन्क्युबेटर्सची कार्यपद्धती समजावून घेणे. कृत्रिम बुद्धिमत्ता () आणि डेटा सायन्सच्या प्रत्यक्ष उदाहरणांचा अनुभव घेणे. उद्योजक व तंत्रज्ञांशी संवाद साधणे. विद्यार्थ्यांनी देशपांडे स्टार्टअप्स या भारतातील सर्वात मोठ्या ग्रामीण टेक्नॉलॉजी बिझनेस इन्क्युबेटरला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध स्टार्टअप संस्थापकांशी थेट संवाद साधला. त्यांनी व्यवसाय संकल्पनेपासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतच्या प्रवासाची माहिती दिली. व चे प्रत्यक्ष उपयोग, विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्सचा समाजोपयोगी प्रकल्पांमध्ये कसा वापर होतो हे पाहता आले. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, महाविद्यालयाचे सर्व विश्वस्त, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे, विभाग प्रमूख प्रा.एस. ए. गायकवाड , प्रा.आर.ए.सरवदे , प्रा .ए. ए. जगताप. श्रीमती जे. डी.मते व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

## विकास मुळे यांचा २९ एप्रिल रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार

आरंभ मराठी | धाराशिव



शिक्षण क्षेत्रात चार दशके निष्ठेने कार्यरत असलेले आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत झटणारे मुख्याध्यापक विकास शामराव मुळे यांचा सेवापुर्ती समारंभ दिनांक २९ एप्रिल रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खेड (ता.जि. धाराशिव) येथे संपन्न होत आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान खेडचे उपसरपंच गणेश गवाड भुषविणार आहेत. या कार्यक्रमास धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनाक घोष हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. शिक्षण, साहित्य, प्रशासन व सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांची या समारंभाला उपस्थिती लाभणार आहे. या वेळी लातूर विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, शिक्षक प्रशिक्षण संस्था धाराशिवचे प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सूर्यकांत भुजबळ, प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील, ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोक मोहेकर, प्रा.भालचंद्र हुचे, गटशिक्षणाधिकारी सय्यद असरार अहम, प्राचार्य सच्चिदानंद लोमटे, माजी उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, शिवाजीराव फाटक, महाराष्ट्र शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष श्रीराम बहीर, प्राथमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, सुनिल मुंढे, लालासाहेब मगर यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमासाठी रवींद्रराज वीर पाटील, प्रकाश पारवे, प्रगती गरड, शेषेराव राठोड , शिक्षक शिवदास बुंदे, प्रकाश विधाते, दिपक पोतदार, अमोल पांचाळ, विद्या मते, मिनाक्षी जमाले व गोपाळ जाधव प्रयत्न करीत आहेत.

## ॲड रमेश भोसले यांची नोटरीपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव:- येथील जेष्ठ विधिज्ञ रमेश भोसले यांची नुकतीच भारत सरकारकडून नोटरी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल ॲड रमेश भोसले यांचा धाराशिव सकल मराठा वधूवर सूचक समितीकडून आई तुळजाभवानी देवीची प्रतिमा व शाल देऊन मान्यवरांचे उपस्थितीत यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी संयोजक अशोकराव गायकवाड,प्रा.अभिमान हंगरगेकर,गोरोबा लोंढे,माजी मुख्याध्यापक अशोक ठोंबळ,माजी गटशिक्षणाधिकारी राजू तांबे,माजी पी एस आय अर्जुन जाधव,अशोकराव चव्हाण,अमोल निंबाळकर,श्री घाडगे-पाटील,श्री शिंदे,सतीश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिर्डी विमानतळावर दोन हेलिपॅड व आठ वाहनतळ उभारण्यास मान्यता

आरंभ मराठी | मुंबई

आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळ येथे दोन हेलिपॅड व ८ वाहनतळ उभारण्यास व विमानतळाचे विस्तारीकरण, अद्ययावतीकरणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता दिली. अमरावती विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचा आराखडा सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ९१ वी बैठक सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली. अमरावती येथे उद्योगाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याने या ठिकाणची धावपट्टी वाढविणे आवश्यक आहे. तसेच या विमानतळापासून महसूल मिळविण्यासाठीचा आराखडा तयार करावा. मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. तसेच शिर्डी येथील विमानतळाच्या कार्गो टर्मिनलचे काम वेगाने सुरू आहे. नाशिकपासून शिर्डी विमानतळ जवळ असल्याने नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या वेळेस हवाई मार्गेने येणाऱ्या भाविकांना शिर्डी विमानतळ सोईचे होणार आहे.

## गिरणी कामगारांना मुंबईत घरे

मुंबई : गिरणी कामगारांनी मुंबईसाठी त्याग केला आहे. त्यामुळे या कामगारांना मुंबईत घरे देण्यास आमचे प्राधान्य आहे. जास्तीत जास्त कामगारांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी 'एनटीसी'समवेत तातडीने बैठक घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. याशिवाय शेलू आणि वांगणी येथील घरांच्या किंमती कशा कमी करता येतील यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू असे आश्वासन उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गिरणी कामगारांना दिले.सह्याद्री अतिथीगृह येथे गिरणी कामगारांच्या घरांसंदर्भात शिष्टमंडळ उपमुख्यमंत्र्यांना भेटले. त्यावेळी झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते.

## मुरुडच्या छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये रोबोटिक्स डेमो शोला पालकांचा प्रतिसाद

आरंभ मराठी | पळसप

मुरुड येथील श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये नव्याने राबविण्यात येत असलेल्या रोबोटिक्स या विषयासंदर्भात एक डेमो शो घेण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दिपक झाडके , सचिव प्रा. दत्तात्रय जाधव , कोषाध्यक्ष प्रा. शंकर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. किलबिल इंटरनॅशनल स्कूल रेणापूरचे संचालक रघुवीर गोडभरले , गंधाधर मोरे , मुख्याध्यापक बाबू थॉमस यांच्यासह कार्यक्रमाचे मार्गदर्शक हैद्राबाद येथून आलेले चरण राज, सतीश कुमार व कु. नंदीनी यांची यावेळी उपस्थिती होती. मुख्याध्यापक बाबू थॉमस यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले तर रोबोटिक्स संदर्भातील संपूर्ण माहिती चरण राज यांनी विविध व्हिडीओच्या माध्यमातून पालक व विद्यार्थी यांना दिली . यावेळी सचिव प्रा. दत्तात्रय जाधव यांनी आधुनिक काळात वाढत्या तंत्रज्ञानाच्या युगात आपला पाल्य परिपूर्ण होण्यासाठी ज्ञानासोबतच कौशल्यही त्यांच्यात निर्माण होणे गरजेचे आहे, त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षात या नविन विषयाचा समावेश करण्यात आला आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर शेटे यांनी तर आभार उमेश कुंभार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान लाभले. कार्यक्रमाला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात पालकांच्या अनेक प्रश्नांची उकल करण्यात आली.

## तरुणांनो, मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करू नका

### सामाजिक कार्यकर्ते विनायकराव पाटील यांचे आवाहन

आरंभ मराठी | उमरगा

वाढती बेरोजगारी, सततची नापिकी या विविध कारणामुळे मराठा समाजातील तरुण अडचणीत आला आहे. मराठा समाजातील तरुणांनी अडचणीवर मात करावी, मात्र मराठा तरुणांनी मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करू नये असे अवाहन जेष्ठ समाजसेवक तथा शेतकरी नेते विनायकराव पाटील यांनी केले. उमरगा तालुक्यातील दाबका येथील तरुण शेतकरी प्रशांत पवार यांनी नुकतीच मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही या नैराश्येतून गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्याग्रस्त प्रशांत पवार कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी जेष्ठ समाजसेवक विनायकराव पाटील यांनी दाबका येथे कुटुबियांची भेट घेऊन सांत्वन केले. या वेळी पाटील यांनी तरुणांना आत्महत्या न करण्याचे आवाहन केले. यावेळी



प्रा. डॉ. शौकत पटेल, सरपंच गोविंद सुर्यवंशी, विष्णू गायकवाड, अखिल भारतीय छावा संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब माने यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना पाटील म्हणाले की, राज्यातील बहुतांश मराठा समाज हा शेतकरी आहे. दिवसेंदिवस कुटुंबाची संख्या वाढू लागल्याने या समाजातील शेतीच्या वाटण्या होऊन अत्यल्प शेती हिश्याला येत आहे. सततची नापिकी , निसर्गाचा लहरीपणा, सुशिक्षित बेरोजगारीचे वाढते प्रमाण यामुळे मराठा समाज अडचणीत आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पासून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या साठी मराठा समाजाने विविध अंदोलने, मोर्चे, उपोषणे केली आहेत. असे असले तरी मराठा समाजाला जाणीवपूर्वक आरक्षणापासून वंचित ठेवण्यात आले आहे. मराठा समाजातील तरुणांनी जिद्दीने व कष्टाने आपल्या संकटावर मात करावी मात्र आत्महत्तेसारखे टोकाचे पाऊल उचलू नये असे आवाहन करून त्यांनी पवार कुटुंबियांचे सांत्वन केले.

## गावकऱ्यांसह शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग

## जलव्यवस्थापन कृती पंधरवडा अंतर्गत वाघोली येथे कार्यक्रम

आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत आयोजित जलव्यवस्थापन कृती पंधरवडा २०२५ कार्यक्रम अंतर्गत धाराशिव तालुक्यातील वाघोली येथे शुक्रवारी (दि.२५) कार्यक्रम घेण्यात आला. याला शेतकरी, गावकरी तसेच शाळकरी विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रतिसाद दिला. यावेळी उपविभागीय अधिकारी स.शि. पाटील यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव पाटबंधारे मंडळ, धाराशिवचे अधीक्षक अभियंता विजय थोरात यांची उपस्थिती होती. तर अध्यक्ष म्हणून माजी सरपंच काशिनाथ बाबा मगर हे होते. यावेळी अधीक्षक अभियंता विजय थोरात यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी जलसंवर्धनाचे महत्व



पटवून दिले. तसेच भविष्यात पाण्याविषयीची गंभीरता याबद्दल जागृती करून त्यावरील उपाय सांगितले. त्यांनी ओढा व नाले यामधील गाळ काढणे, पाणी वापर व जलव्यवस्थापन तसेच पीक पद्धती, पाणी देण्याच्या आधुनिक पद्धती, गाळमुक्त धरण व गाळयुक्त जमीन याबाबत शेतकऱ्यासोबत चर्चा केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी जि.प.प्र. शाळा वाघोली येथे जाऊन वृक्षारोपण केले. यावेळी कार्यक्रमाला कार्यकारी अभियंता दिनेश खड़े, कार्यकारी अभियंता प्रवीण चावरे, संजय थोरात, संजय खडके, नितीन चव्हाण उपसरपंच, प्रवीण शिंदे, ओम प्रकाश मगर माजी सभापती, सतीश खडके, चंद्रशेखर उंबरे यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते. धर्मराज पाटील यांनी आभार मानले.

## मुक्त गाई गोठा पालनातील दुग्धव्यवसायातून आर्थिक प्रगती

### टेंभी येथील प्रगतशील शेतकरी अरुण निवृत्तीराव भुजबळ यांचा यशस्वी प्रयोग

आरंभ मराठी | पळसप

शेतीला जोड व्यवसाय म्हणून अनेक शेतकरी दुग्धव्यवसायाकडे वळतात. मात्र योग्य नियोजन न केल्याने आणि जनावरांना लागणारा निवारा आणि स्वच्छता सारख्या समस्यामुळे जनावरांच्या मेडिसीनचा खर्च, चाऱ्याचा खर्च यांचा समनव्यय न साधल्याने



अनेक शेतकऱ्यांना यातून चांगला नफा मिळत नसल्याने ते निराश होतात. जर चांगल्या पद्धतीने नियोजण केल्यास हमखास नफा मिळवणारे अनेक शेतकरी दुग्ध व्यवसायामध्ये यशस्वी झालेले पाहायला मिळतात.यामध्ये निवाऱ्यासाठी गोठ्याचे







सुनियोजित नियोजन ,जनावरांच्या योग्य जातीची निवड, त्यांची स्वच्छता आणि गाईंच्या आरोग्यासंबंधी वेळच्या वेळी घेतली जाणारी काळजी या सर्व गोष्टी प्राधान्याने केल्यास दुग्धव्यवसायातून चांगला नफा कमवता येतो, याचे उत्तम उदाहरण पहायला मिळते ते औसा तालुक्यातील टेंभी येथील प्रगतशील

शेतकरी अरुण निवृत्ती राव भुजबळ यांच्या शेतामध्ये. त्यांना केवळ साडेचार एकर जमीन आहे. मात्र योग्य नियोजन करून दुग्धव्यवसायासाठी त्यांनी अर्धा एकर क्षेत्रावर मुक्त गाई गोठा पालनाचे उत्तम नियोजन केले आहे. तर एक एकर क्षेत्रावरती गाईंच्या हिरव्या चाऱ्याची व्यवस्था केलेली आहे. त्याच बरोबर याच्या जोडीला त्यांची दोन एकर क्षेत्रावरती भाजीपाला नर्सरी आहे .त्यांच्याकडे सद्या २१ गाई आहेत. त्यातील १३ गाई दूध देणाऱ्या आहेत मुक्त गाईगोठा अतिशय ऊत्तमरित्या केला असून, सर्व जनावरांना चारा, पाणी, मॅट सिस्टीम, पावसाळ्यात निवाऱ्याची ऊत्तम सोय, तर उन्हाळ्यात चारी बाजूने झाडी लावल्याने गरमीची समस्या उद्भवत नाही. सद्या ते दिवसाला १०० ते ११० लिटर दूध ३२ रु दराने विक्री करतात. यातून महिन्याला त्यांना खर्च वजा जाता साठ ते सत्तर हजार रुपये नफा मिळतो. म्हणजे सरासरी वर्षाला ते दुग्ध व्यवसायातून पाच ते सहा लाख रुपये उत्पन्न मिळवतात.

या बरोबरच सोबतीला त्यांचा भाजीपाला नर्सरीचा व्यवसाय आहे. जमिनीचे कमी क्षेत्र असूनही भुजबळ कुटुंब यांनी आपली आर्थिक प्रगती केली असल्याचे दिसून येते. यातून त्यांचे कुटुंब समाधानी असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले.

## पहलगाम दुर्घटनेत जखमी व कुटुंबियांसाठी महापालिका रुग्णालयांची आरोग्य सेवा

मुंबई : पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दुर्घटनेनंतर जखमी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मुंबई महानगरपालिकेच्या टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज आणि बीवायएल नायर हॉस्पिटल, गोरधनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज आणि केइएम हॉस्पिटल, लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज आणि लोकमान्य टिळक म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मेडिकल कॉलेज आणि आर एन कूपर हॉस्पिटलमध्ये मानसिक आरोग्य सेवा विविध पातळ्यांवर उपलब्ध करून दिल्या आहेत.मुंबईतील या चार प्रमुख महापालिका रुग्णालयात सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत समुपदेशन, तीव्र तणावाचे मूल्यमापन, पीटीएसडीची शक्यता, औषधोपचार आणि आवश्यकतेनुसार भरती यासह सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच याच रुग्णालयांमध्ये रात्री ४ ते सकाळी ९ या वेळेत तणाव, निद्रानाश, अस्वस्थता, घटना पुन्हा अनुभवण्याची भावना यासाठी आपत्कालीन समुपदेशन व औषधोपचाराची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.